महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

## भूमि अभिलेख विभाग

दिनांक - १५/१२/२०२२ HELPLINE NUMBER- ०२०- २५७१२७१२

## <u>सरळसेवा भरती २०२१</u>

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गाकरीता जाहिरातीत नमूद १०१३ पदे सरळसेवेने भरण्याकामी IBPS कंपनीमार्फत दिनांक २८/११/२०२२ ते ३०/११/२०२२ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली आहे.

वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ.पु.क. दिनांक ३१/१०/२०२२ नुसार पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात येवून ज्या विभागांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला नाही अशा विभागांना रिक्त पदांच्या ८०% पदे भरण्याकामी मुभा देण्यात आलेली आहे. तसेच महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राभूअ २०१९/प्र.क्र.५५/ई-६ दिनांक २४/११/२०२२ नुसार पुणे विभागाकरीता पदोन्नती कोट्यातील १०० पदे एकवेळ सरळसेवा कोट्यात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील परिच्छेदात नमुद शासन निर्णयानुसार पदभरतीकामी जाहीरातीत नमुद पदांमध्ये वाढ होणार आहे. त्यानुसार वाढीव पदांचा समावेश करुन पदभरती करण्यास मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशांनुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येणार असल्यामुळे या पुर्वी जाहीर केल्याप्रमाणे दिनांक १५/१२/२०२२ रोजी निकाल जाहीर करणे शक्य होणार नाही.

या कार्यालयाकडून सादर प्रस्तावानुसार शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशांप्रमाणे निश्चीत होणाऱ्या पदांनुसार ऑनलाईन परीक्षेचा निकाल दिनांक २६/१२/२०२२ च्या दरम्यान जाहीर करण्याचे प्रस्तावित आहे.

स्वा./-XXX

(एन. के. सुधांशु) भा.प्र.से.

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**

**भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ), पुणे**